नाशिक

दि. ०२/०३/२०२१

# प्रेसनोट

## इलोसे (१) श्रीमती शिला नामदेव सुर्यवंशी, समुपदेशक, महिला समुपदेशन केंद्र, नाशिक, (२) श्रीमती हिरा सुभाष शिरके (खाजगी व्यक्ती) यांना १०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना ला.प्र.वि. नाशिक विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८)चे कलम ७, ७अ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | १) श्रीमती शिला नामदेव सुर्यवंशी, समुपदेशक, महिला समुपदेशन केंद्र, नाशिक<br>२) श्रीमती हिरा सुभाष शिरके (खाजगी व्यक्ती) |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार व त्यांची पत्नी यांचेमध्ये कौटूंबिक वाद सुरू असून सदर वादाचे प्रकरण हे महिला समुपदेशन केंद्र नाशिक यांचेकडे होते. सदर प्रकरणात दि. १०/०२/२०२१ रोजी लेखी नोटीसद्वारे तक्रारदार व त्यांची पत्नी यांना महिला समुपदेशन केंद्र नाशिक येथे बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांचेत समजोता झाला परंतू दिनांक ०१/०३/२०२१ रोजी तक्रारदार यांचे पत्नीने पुन्हा तक्रार केल्याने तक्रारदार यांना महिला समुपदेशन केंद्र नाशिक येथे बोलविण्यात आले. त्यावेळी तेथील महिला समुपदेशक श्रीमती शिला नामदेव सुर्यवंशी यांनी सदरचे प्रकरणात कोणतीही कारवाई न करता प्रकरण मिटविणेसाठी तक्रारदार यांचेकडे १०,०००/— रू. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन आज दि. ०२/०३/२०२१ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता इलोसे (१) श्रीमती शिला नामदेव सुर्यवंशी, समुपदेशक, महिला समुपदेशन केंद्र, नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/— रुपये लाचेची मागणी करून तक्रारदार यांना सदर लाचेची रक्कम आरोपी क्र. (२) श्रीमती हिरा सुभाष शिरके (खाजगी व्यक्ती) यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानुसार आरोपी क्र. २ श्रीमती शिरके यांनी तक्रारदार यांचेकडून १०,०००/— रू. लाचेची रक्कम स्विकारल्याने दोन्ही आरोपींविरूध्द सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net

टोल फ्री क्र. : १०६४

दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०

व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

2.3.2021

( विजय जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता